पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८

मा.शहर सुधारणा समिती

कार्यपत्रिका क्रमांक ४

**सभावृत्तांत**

दिनांक - १७/०७/२०१३ वेळ दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक १७/०७/२०१३ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१)** मा. सुपे आशा रविंद्र - **सभापती**
२) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३) मा.सौ.साळुंखे सविता सुरेश
४) मा. उषा संजोग वाघेरे (पाटील)
५) मा. जयश्री वसंत गावडे
६) मा. चारुशिला प्रभाकर कुटे

या शिवाय मा.तानाजी शिंदे – अति.आयुक्त,मा. गावडे – नगरसचिव,मा.तांबे – कार्यकारी अभियंता, मा.चौरे – उपनगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र. २) पिं.चिं.मनपा हद्दीमधील प्रमुख रस्त्यांवर विकसीत केलेल्या वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणेबाबत..

विषय क्र. ३) लक्ष्मीनगर पिं. चिं. लिंकरोड येथील सर्वे नं.२६८ मधील आरक्षण क्र.२३७ येथील आरक्षणात बदल करणेबाबत..मा.जयश्री गावडे,मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव..

विषय क्र. ४) प्रभाग क्र.४५ पिंपरी गावातील मोनिका बिल्डींग शेजारील आरक्षण क्र.३०९ खेळाचे मैदान जागा भुसंपादनाची कार्यवाही होण्याबाबत..मा.उषा वाघेरे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव..

दिनांक १९/०६/२०१३, ०३/०७/२०१३, ०९/०७/२०१३ (दु.१२.०० व ४.३० वा.) रोजी झालेल्या सभेचा ( **कार्यपत्रिका क्र. ३** ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – २० | विषय क्रमांक - १
दिनांक - १७/०७/२०१३ | विभाग – क प्रभाग
सूचक – मा.आशा सुर्यवंशी | अनुमोदक – मा.चारुशिला कुटे

संदर्भ : मा.प्रभाग अधिकारी यांचेकडील जा.क्र. कप्रस/सभा/११/कावि/१५७/२०११, दिनांक २४/१०/२०११

विषय – प्रभाग समिती सभा ठराव क्र.४२ विषय क्र.१ मा.महापालिका सभेची मान्यता घेणेबाबत.

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – २१ | विषय क्रमांक - २
दिनांक - १७/०७/२०१३ | विभाग – वाहतुक कक्ष
सूचक – मा.आशा सुर्यवंशी | अनुमोदक – मा.उषा वाघेरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.स्था/वाक/कावि/१२२/२०१३, दि.१०/७/२०११

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीमधील काही प्रमुख रस्त्यांवर फ्लायओव्हरखाली व वाहनतळांच्या जागांवर दुचाकी व चारचाकी वाहनांकरीता पे & पार्क योजना राबविणे आवश्यक आहे. याकरीता पिं.चिं.मनपा हद्दीतील भोसरी फ्लायओव्हर,निगडी फ्लायओव्हर,चाफेकर चौक फ्लायओव्हर,क्रोमा शोरुम शेजारील जागा या ठिकाणी पे & पार्क योजना राबविणेचे नियोजन आहे. याकामी पुणे मनपा कडील पे & पार्क च्या दरांचा अभ्यास केला असुन त्यांचेकडील दर पिं.चिं.मनपा क्षेत्रातही लागु केल्यास सुसूत्रता राहील असे वाटते. त्यानुसार पे & पार्क चे शुल्क (Telescoping Parking Charges) पुढीलप्रमाणे सुचविणेत येत आहे.

१) रस्त्यावरील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता -

पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.३/-

१ तासापुढील कालावधीसाठी – र.रु.४/- प्रति/तास

ब) चारचाकी वाहनांकरीता -
प्रत्येक तासाकरिता – र.रु. १०/-

२) मनपामार्फत तसेच विकास आराखडयातील तरतुदीनुसार विकसित केलेले वाहनतळ /फ्लायओव्हर खालील वाहनतळ

अ) दुचाकी वाहनांकरिता –
पहिल्या एक तासापर्यंत – र.रु.२/-
१ तासापुढील कालावधीसाठी र.रु.३/-प्रति/तास
फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. १५०/-

ब) चारचाकी वाहनांकरिता -
प्रत्येक तासाकरिता – र.रु.१०/-
फक्त रात्री ९ ते सकाळी ८ या कालावधीसाठी मासिक पास शुल्क र.रु. ४५०/-

विद्यार्थ्यांसाठी मनपामार्फत देण्यात येत असलेल्या अन्य सवलतीचे धोरणांनुसार विद्यार्थ्यांना पार्किंग सवलत देऊन त्यांना त्यांचे शाळेचे /कॉलेजचे ओळखपत्र व वाहन परवाना सादर केल्यास त्यांना दरमहा र.रु. १००/- याप्रमाणे पार्किंग शुल्क आकारावे. तसेच सदर पे & पार्क योजनेअंतर्गत दूचाकी व चारचाकी वाहनांकरिता ३ वर्ष कालावधीसाठी ठेका देणेसंदर्भातील अटी व शर्ती प्रस्तावा सोबत जोडलेल्या प्रपत्राप्रमाणे आहेत.सदरचे पे & पार्क योजनेच्या प्रस्तावित दरास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २२ विषय क्रमांक - ३
दिनांक - १७/०७/२०१३
सूचक – मा.जयश्री गावडे अनुमोदक – मा.उषा वाघेरे
संदर्भ : मा.जयश्री गावडे, मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२४ (प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह) मधील पिंपरी चिंचवड येथील लक्ष्मीनगर येथे सर्वे नं.२६८ मधील भुखंडामध्ये,आरक्षण क्र.२३७, बेघरांसाठी घरे या कारणास्तव आरक्षण केलेले आहे.
परंतु सदर भुखंड हा पुरनियंत्रण रेषेत आहे. त्यामुळे बेघरांसाठी घरे या विषयास अनुसरुन आरक्षित केलेल्या जागेचा मुळ हेतु साध्य होत नाही किंवा बांधकाम करता येणार नाही. म्हणजेच सदर जागेत मनपाच्या नियमानुसार कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नसल्यामुळे सदर भुखंडामधील, बेघरांसाठी घरे हे असलेले आरक्षण बदलुन सदर भुखंडाची जागा ही गार्डनसाठी आरक्षित करण्यात यावी. कारण पिं.चिं. लिंक रोड परिसरात २० हजारांहुन जास्त लोकसंख्या आहे. सदर परिसरात सुमारे ४ ते ५ हजार इतकी फ्लॅटची संख्या आहे. स्मशानभुमी, झोपडपट्टी,मोठया प्रमाणावर नाला, दोन मैला शुध्दीकरण प्रकल्प,काही ठिकाणी छोटे रस्ते आहेत. तसेच मोठमोठया सोसायटया असुन सदर सोसायटयांना गार्डन नाही. त्यामुळे तेथील लहान मुलांना खेळण्यासाठी तसेच जेष्ठ नागरिकांना बसण्यासाठी गार्डनची व्यवस्था नाही. मुलांना मोकळा श्वास घेण्यासही खुल्या हवेची जागा नसल्याने

तसेच परिसरातील नागरिकांच्या सोयीसाठी सदर जागेचा गार्डनसाठी विचार करावा. त्यामुळे सदर आरक्षित जागेचा योग्य वापर होईल व नागरिकांना त्याचा उपभोग घेता येईल. तरी सदर जागेतील वरील आरक्षण बदलुन गार्डनसाठी आरक्षण करणेकामी सदरचा ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – २३ विषय क्रमांक - ४

दिनांक - १७/०७/२०१३

सूचक – मा.उषा वाघेरे अनुमोदक – मा.आशा सुर्यवंशी

संदर्भ : मा.उषा वाघेरे,मा.आशा सुर्यवंशी यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४५ मधील मोनिका बिल्डींग, विशाल आंगण यांच्या सोसायटी मधील मोकळी जागा सर्वे नं. ३०९ खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असुन सदर जागा ताब्यात घेण्यासाठी भुसंपादनाची कार्यवाही करुन जागा ताब्यात घेणेकामी मा. महापालिका सभेकडे पाठविणेची शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुपे आशा रविंद्र )**
**सभापती**
मा.शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ७०९ /२०१३
दिनांक - ३०/०७/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.